# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/९६९ /२०२५ दि.१३/०८/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी**, **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक १६/०८/२०२५ रोजी स्वामी प्रतिष्ठान, ठाणे यांच्या वतीने काशीनाथ घाणेकर चौक येथे **'दहिहंडी'** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने सदर ठिकाणी नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही. ए./११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) उपवन, पवानगर कडून डॉ. काशिनाथ घाणेकर चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **त्यागराज बिल्डींग कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने त्यागराज बिल्डींग कट येथे उजवे बाजूस वळण घेवून वसंत विहार स्कूल सर्कल, वसंत विहार सर्कल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक) कडुन पुढे तुलशीधाम रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) वसंतविहार सर्कल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक) कडून डॉ. काशिनाथ घाणेकर चौक/पवारनगर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लोक पुरम पब्लिक स्कुल कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने वसंत विहार सर्कल चौकातुन (डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक) तुलशीधाम/वसंतविहार स्कुल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) खेवरा सर्कल कडून डॉ.काशिनाथ घाणेकर चौक/ पवारनगर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शिवसेना शाखा क्र.०४ समोर खेवरा सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने खेवरा सर्कल येथुन दोस्ती इंम्पीरिया बिल्डींग मार्गे सर्व्हिस रोडने तुळशीधाम, वसंत विहार सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) सुर्या टॉवर बिल्डींग कडुन काशीनाथ घाणेकर/पवारनगर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जेमीनी बिल्डीग सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** **अ)** सुर्या टॉवर बिल्डींग चौकातुन तुलशीधाम/वसंत विहार स्कुल मार्गे इच्छित स्थळी जातील.
**ब)** सुर्या टॉवर बिल्डींग येथुन हाईडपार्क बस स्टॉप सर्व्हिसरोड मार्गे दोस्ती इंम्पीरीया बिल्डीग येथुन इच्छित स्थळी जातील.

**सदर वाहतूक अधिसुचना दि. १६/०८/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते रात्रौ २२.०० वाजेपावेतो लागू राहील.**

सदर अधिसूचना पोलीस वाहने, रूग्णवाहीका, फायर ब्रिगेड व अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u> :-**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५/ वि.शा. ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :-**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
**<u>प्रत</u>** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**<u>प्रत</u>** :— सपोआ ठाणे/वागळे वाहतूक विभाग, पोनि. कासारवडवली, कापुरबावडी, वागळे वाहतूक उपविभाग ठाणे शहर